**संच : क**

# शिक्षकांसाठी सूचना तिसरी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

### इयत्ता - तिसरी
### विषय : मराठी

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ३०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) कागद | २) पर्वत |
| ३) चिकाटी | ४) पत्र |
| ५) हुशार | ६) टक्कल |
| ७) कैलास | ८) रंग |
| ९) मस्त | १०) वॉटर |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'कैलास' ऐवजी 'कइलास' किंवा 'चिकाटी' ऐवजी 'चीकाटी'/ चीकाटि असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४ साठी) हा उतारा वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न २) ब)** बाजारात (गुण १)

**प्रश्न ३)** शिवराम राजधानीत गेला व त्याने अकबर बादशहाकडे तक्रार केली. (गुण २)

**प्रश्न ४) ब)** कपटी (गुण २)

**प्रश्न ५) चौकटीत लपलेल्या कोणत्याही पाच फुलांची नावे शोधून लिही.** (गुण ५)

उदा. मोगरा, चाफा, सदाफुली, जाई, कमळ

यापैकी कोणत्याही पाच अचूक उत्तरास गुणदान करावे. ('गुलाब' या शब्दासाठी गुणदान करू नये.)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**प्रश्न ६)** वेदांत कैरी खातो. (गुण १)

**प्रश्न ७)** सुनीलकडे पाच चेंडू होते/आहेत. (गुण १)

**प्रश्न ८)** मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन. (गुण १)
(पालकांचा नंतर स्वल्पविराम व ठेवीन नंतर पूर्णविराम दिल्यास प्रत्येक विरामचिन्हाला अर्धा गुण याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न ९) 'टपटप' शब्दाचा वापर केलेले कोणतेही अर्थपूर्ण वाक्य असल्यास एक गुण द्यावा.** (गुण १)

**प्रश्न १०) 'चालणे' या शब्दाचे योग्य रूप वापरून वाक्य लिहिलेले असल्यास एक गुण द्यावा.** (गुण १)

**प्रश्न ११) कामाबद्दल पाच प्रश्न विचार. ते खाली दिलेल्या जागी लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन

**उद्दिष्ट :** हा प्रश्न मुलांचे प्रश्न कौशल्य तपासण्यासाठी आहे.

**गुणदान :**
- सर्व वाक्ये प्रश्नार्थी आहेत आणि सर्व वाक्यांच्या शेवटी प्रश्नचिन्हे दिली आहेत याची खात्री करावी.
- तसेच प्रश्न चित्रातील व्यक्तींच्या कामाशी संबंधित आहेत याची खात्री करावी.
- एकाच स्वरूपाचे जास्त प्रश्न विचारल्यास त्या सर्व प्रश्नांना मिळून एकच गुण द्यावा. उदा. एका माठाचे किती रुपये घेता? दोन माठांचे किती रुपये? इत्यादी.
- प्रत्येक बरोबर प्रश्नास एक गुण द्यावा. प्रमाण लेखनाची अपेक्षा करू नये.
- प्रश्नचिन्ह नसल्यास एकूण गुणांपैकी अर्धा गुण कमी करावा.

**प्रश्न १२) खालील चित्र पहा आणि त्यावर एक गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्दिष्ट :** मुलांची अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** लेखन नियमांनुसार तपासू नये.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरित्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण चित्राचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले अर्थपूर्ण लेखन. पण गोष्ट असेल असे नाही. |
| ४ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

**संच : क**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : हा उतारा व्यवस्थित वाच. वाचून झालं की मी तुला काही प्रश्न विचारणार आहे. त्याची तू उत्तरं द्यायची.

**उतारा :**

**आज सायलीचा वाढदिवस होता. तिने बाबांकडे फिरायला जाण्याचा हट्ट केला. बाबा तिला फिरायला घेऊन एका शाळेत गेले. तिथे सर्व अपंग मुले होती. तिथे एक मुलगा पायाने चित्र रंगवत होता. सायलीला आश्चर्य वाटले. तिने त्या मुलाकडे पाहिले त्याला हात नव्हते. सायलीला फार वाईट वाटले.**



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न २) सायली बाबांबरोबर कुठे गेली होती?** | (१) | (ब) |

अ) सर्कसला

ब) अपंग मुलांच्या शाळेत

क) बागेत

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न ३) सायलीला वाईट का वाटल?** | (२) | (ब) |

अ) चित्र काढणाऱ्या मुलाला बघितल्यामुळे

ब) चित्र काढणाऱ्या मुलाला हात नव्हते म्हणून

क) बाबांनी भेटवस्तू न दिल्यामुळे

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न ४) सायलीचा स्वभाव कसा होता?** | (२) | (ब) |

अ) रागीट

ब) प्रेमळ

क) भित्रा

■■■



**Runa Graphics :** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*